**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या मंगळवार दिनांक २५.०३.२०२६ रोजी संपन्न झालेल्या ६४ व्या बैठकीचे इतिवृत्त.**

मा. ना. श्री. आकाश फुंडकर, मा. मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ६४ वी बैठक बुधवार दिनांक २५.०३.२०२५ रोजी सायं. ४.०० वा. मा. मंत्री, (कामगार) तथा मा. अध्यक्ष महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांचे दालन क्र.८४, जॉली मेकर ०१ प्रिमायसेस को. ऑप. सोसायटी लि., आठवा मजला, नरीमन भवन प्लॉट क्र.९५,९६ व ९७, कफ परेड, कुलाबा, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य बैठकीस उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नाव | पद |
|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. आकाश फुंडकर | मा. मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |
| २. | मा. श्रीम. आय. ए. कुंदन, प्रधान सचिव (कामगार) | शासकीय प्रतिनिधी |
| ३. | मा. डॉ. एच. पी. तुम्मोड, कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई | शासकीय प्रतिनिधी |
| ४. | मा. श्री. दिपक पोकळे, उप सचिव (कामगार-७) | शासकीय प्रतिनिधी |
| ५. | मा. श्री. विवेक कुंभार | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |

बैठकीच्या सुरुवातीस मंडळ सचिव यांनी मा. मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष, मा. प्रधान सचिव, कामगार विभाग मा. कामगार आयुक्त, मंडळ सदस्य या उपस्थितांचे स्वागत केले व बैठकीत करावयाच्या विषयांशी संबंधित कागदपत्रांचा संचाच्या प्रती सर्व उपस्थित सदस्यांना वाटप करण्यात आली. तद्नंतर विषयसुचीनुसार चर्चेस सुरुवात करण्यात आली.

**विषय क्र. ०१:- मंडळाचे सन २०२५-२६ चे सुधारित अर्थसंकल्प अंदाजपत्रकास मंडळाची मान्यता देणे**

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ मधील कलम २५ नुसार मंडळाने प्रत्येक आर्थिक वर्षाचे अर्थसंकल्प अंदाजपत्रक विहित केलेल्या नमुन्यात तयार करुन केंद्र व राज्य शासनास सादर करणेबाबत तरतूद आहे. त्यानुसार मंडळाने सन २००७-०८ पासून सन २०२५-२६ अखेर आर्थिक वर्षनिहाय मुळ व सुधारीत अंदाजपत्रके तयार करून त्यास वेळोवेळी मंडळाची मान्यता घेतली आहे. सद्या सन २०२५-२६ चे सुधारीत अंदाजपत्रकास मंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**<u>मंडळाचे सन २०२५-२६ चे सुधारित अर्थसंकल्प अंदाजपत्रक</u>**

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ मधील कलम २५ नुसार, मंडळाचे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे रु. ६७०९२३.९१ लाख जमेचे व रु. ६७२९६२.१३ लाख एवढया खर्चाचे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. मंडळाच्या दि. २८.०३.२०२५ अन्वये, सदर मूळ अर्थसंकल्प अंदाजपत्रक राज्य व केंद्र शासनास सादर करण्यात आले आहे. तद्नंतर दि. २६.०३.२०२५ रोजीच्या मंडळाच्या ६२ व्या बैठकीत सन २०२५-२६ च्या मुळ अंदाजपत्रकास मान्यता घेण्यात आली आहे.

शासनास सादर करण्यात आलेल्या सन २०२५-२६ च्या मुळ अंदाजपत्रकाच्या अनुषंगाने माहे नोव्हें.,२०२५ अखेर आठमाही प्रत्यक्ष जमा व खर्चावर आधारीत उर्वरीत चारमाही करीता संभाव्य जमा व खर्चाच्या आधारे सन २०२५-२६ चे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सन २०२५-२६ चे सुधारित अंदाजपत्रकाचा गोषवारा पुढीलप्रमाणे-

## सुधारित अंदाजपत्रक जमेचा गोषवारा

(रु. लाखात)

| अ क्र | बाब (जमा) | मूळ अंदाजपत्रक सन २०२५-२६ (BE) | माहे एप्रिल ते नोव्हें., २०२५ अखेर आठमाही प्रत्यक्ष जमा | माहे डिसें. २०२५ ते मार्च २०२६ या चारमाही करीता संभाव्य अंदाजित जमा | सन २०२५-२६ मधील जमेचे सुधारित अंदाज (RE) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६(४+५) |
| १ | उपकर | ६००००० .०० | २५८९७४.७८ | १४८७५७.०८ | ४०७७३१.८६ |
| २ | व्याज (बँकेतील बचत खाती व मुदत ठेवी ) | ७०८७८.९० | ४६४८४.०६ | १६८७२.७६ | ६३३५६.८२ |
| ३ | बांधकाम कामगार नोंदणी शुल्क | ३०.०० | १३.०९ | ०.०६ | १३.१६ |
| ४ | बांधकाम कामगार नुतनीकरण शुल्क | १५.०० | ३.९७ | ०.०३ | ४.०० |
| ५ | इतर किरकोळ जमा | ०.०१ | ०.०२ | ०.१५ | ०.१७ |
| | **एकूण जमा** | **६७०९२३.९१** | **३०५४७५.९२** | **१६५६३०.०८** | **४७११०६.०१** |

## सुधारित अंदाजपत्रक खर्चाचा गोषवारा

(रु. लाखात)

| अ.क्र | बाब (खर्च) | मूळ अंदाजपत्रक सन २०२५-२६ (BE) | माहे एप्रिल ते नोव्हें., २०२५ अखेर आठमाही प्रत्यक्ष खर्च | माहे डिसें. २०२५ ते मार्च २०२६ या चारमाही करीता संभाव्य अंदाजित खर्च | सन २०२५-२६ मधील खर्चाचे सुधारित अंदाज खर्च (RE) |
|---|---|---|---|---|---|
| १ | विविध कल्याणकारी योजनांवरील खर्च | ६६०८१०.०५ | ४१६१६५.५३ | २१९१५१.५३ | ६३५३१७.०६ |
| २ | प्रस्तावित योजना | १०००.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ३ | प्रशासकिय खर्च | ११०४६.०८ | ४४१९.७९ | २६३४.६० | ७०५४.३९ |
| ४ | उपकर जमा रक्कमेपोटी देय प्रशासकीय खर्चाची (१%) तरतूद | ६.०० | ८.३३ | ४.१७ | १२.५० |
| ५ | नजर चुकीने/ अनावधानाने जमा रक्कमेचा परतावा | १००.०० | ३३.०६ | ५.६१ | ३८.६७ |
| | **एकूण खर्च** | **६७२९६२.१३** | **४२०६२६.७१** | **२२१७९५.९१** | **६४२४२२.६२** |

**ठराव क्र. ६४ (१)/२०२६:-**

**मंडळाच्या सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये सुधारीत जमा तरतुद रू. ४,७१,१०६.०१ लाख आणि सुधारीत खर्च तरतुद रू. ६,४२,४२२.६२ लाख इतक्या रक्कमेच्या सुधारीत अर्थसंकल्प अंदाजपत्रकास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र. ०२:- मंडळाचे सन २०२६-२७ चे मूळ अर्थसंकल्प अंदाजपत्रकास मंडळाची मान्यता देणे.**

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ मधील कलम २५ नुसार, सन २०२४-२५ या आर्थिक वर्षांचा प्रत्यक्ष जमा व खर्च आणि सन २०२५-२६ या चालू वर्षाचे सुधारीत अंदाज या आधारे सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाचे रु.६७६३००.२० लाख जमा व रु. ६७१०८८.२९ लाख खर्चाचे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. प्रत संलग्न सन २०२६-२७ चे मूळ अंदाजपत्रकाचा गोषवारा खालीलप्रमाणे-

## सन २०२६-२७ मधील जमा व खर्चाचा गोषवारा

(रूपये लाखात)

| अ.क्र | बाब (जमा) | अपेक्षित जमा | बाब (खर्च) | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | उपकर | ६१००००.०० | विविध कल्याणकारी योजनांवरील खर्च | ५७८४४३.२५ |
| २ | बँकेतील मुदतठेवीवरील व्याज | ६६३००.०० | प्रस्तावित योजना | ८५०००.०० |
| ३ | नोंदणी फी | ०.०० | प्रशासकिय खर्च | ७७८५.०४ |
| ४ | मासिक वर्गणी | ०.०० | नजर चुकीने/ अनावधानाने जमा रक्कमेचा परतावा | ४२.०० |
| ५ | इतर जमा | ०.२० | उपकर जमा रक्कमेपोटी देय प्रशासकीय खर्चाची (१%) तरतूद | १४.०० |
| | **एकूण जमा** | **६७६३००.२०** | **एकूण खर्च** | **६७१२८४.२९** |

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षांचे अंतिम जमा आकडेवारी आणि सन २०२५-२६ या चालू वर्षाचे सुधारीत जमेचे अंदाज व त्याप्रमाणात विविध महसुली जमेच्या बाबींवरील सरासरी वाढ तसेच प्रस्तावित मंडळ सेस पोर्टलचे विकसन इ. आधारे सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये जमेची मुळ तरतूद रू ६७६३००.२० लाख अंदाजित केली आहे.

तसेच, सन २०२४-२५ या आर्थिक वर्षांचे अंतिम खर्चाची आकडेवारी आणि सन २०२५-२६ या चालू वर्षाचे सुधारीत खर्चाचे अंदाज व त्याप्रमाणात विविध महसुली खर्चाच्या बाबींवरील सरासरी वाढ तसेच प्रस्तावित नवीन कल्याणकारी योजना (महानगरपालिका क्षेत्रात मोबाईल व्हॅन (mobile van) द्वारे बांधकाम कामगारांची नोंदणी नुतनीकरण इ. करणे, नव्याने लागू झालेल्या सामाजिक सुरक्षा संहिता - २०२० नुसार प्रस्तावित नवीन योजना कार्यान्वित करणे) इ. आधारे सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये खर्चाची मुळ तरतूद रू ६७१२८४.२९ लाख अंदाजित केली आहे.

ठराव क्र. ६४ (२)/२०२६:-

मंडळाच्या सन २०२६-२७ या आगामी आर्थिक वर्षाच्या मुळ जमा तरतुद रू. ६,७६,३००.२० लाख आणि मुळ खर्च तरतुद रू. ६,७१,२८४.२९ लाख इतक्या रक्कमेच्या मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई